पुण्यनगरी दि ०७/०२/२०२३

# दोन जीवंत काडतुसासह एक गावठी पिस्टल जप्त

## स्थागुशाची कारवाई



**नांदेड/प्रतिनिधी**

तरोडा नाका परिसरात एका आरोपीकडे गावठी पिस्टल असल्याची माहिती मिळाल्यावरुन स्थागुशाच्या पथकाने शेख जुनेद पि. शेख हबीब (२०, व्यवसाय ऑटो चालक रा. जुम्मा पेठ, ता. वसमत जि. हिंगोली) यास ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ४१ हजार २०० रुपये किंमतीचे गावठी पिस्टल व दोन जीवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.

स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरुन ६ फेब्रुवारी २०२३ रोजी तरोडा भागात शेख जुनेद या २० वर्षीय तरुणाला ताब्यात घेण्यात आले. त्यांची झडती घेतली असता त्याच्या कमरेला ४१ हजार २०० रुपये किंमतीचे एक गावठी पिस्टल व दोन जिवंत काडतुसे मिळुन आले. स्थागुशाचे सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने यांनी पिस्टल व काडतुसे जप्त करुन भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी अवैद्य शस्त्र बाळगणाऱ्या आरोपींची माहीती काढुन त्यांच्याविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. या अनुषंगाने स्थागुशाची पथके फिरत आहेत. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर, सपोनि पांडुरंग माने, पोउपनि जसवंतसिंघ शाहु, पोना संजीव जिंकलवाड, पोकॉ मोतीराम पवार, पोकॉ महेश बडगु, चा.पो.कॉ. गंगाधर घुगे, चापोकॉ हेमंत बिचकेवार यांनी ही कामगीरी केली. पोलीस अधीक्षकांनी या सर्वांचे कौतुक केले आहे.